महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब, (राजपत्रित) संवर्गातील सहायक लेखा अधिकारी यांच्या विभाग संवर्ग बदलीबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन आदेश क्र.सेवाप्र-२०२४/प्र.क्र.२०/कोषा प्रशा-३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १५ मार्च, २०२४

वाचा :- सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२, दि.१४.७.२०२१ .

## शासन आदेश

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहायक लेखा अधिकारी (गट-ब) संवर्गातील खालील विवरणपत्रात नमूद अधिकाऱ्यांनी संदर्भाधीन अधिसूचनेतील तरतूदीनुसार महसूली विभाग बदलीबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने, या आदेशान्वये त्यांचे सध्याचे कार्यरत स्तंभ क्र.३ येथे नमूद केलेले महसूली विभाग बदलून त्यांना स्तंभ क्र.४ येथे नमूद केलेले महसूली विभाग वाटप करण्यात येत आहे. सदर अधिकाऱ्यांची महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ च्या कलम ४ (४) व (५) मधील तरतूदीनुसार खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र.५ मध्ये नमूद पदावर संवर्ग बदली करण्यांत येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व सध्याचे कार्यालय | सध्याचा कार्यरत महसूली विभाग | बदलून दिलेला महसूली विभाग | बदलीने पदस्थापना द्यावयाचे पद व कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्रीम. निलम सुभाष कांबळे<br>सहायक लेखा परीक्षा अधिकारी, | नागपूर | कोकण-२ | सहायक लेखा परीक्षा अधिकारी, सहसंचालक महानगरपालिका |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | उपसंचालक महानगरपालिका लेखापरीक्षण, स्थानिक निधी लेखापरीक्षा, उपविभाग-३, नागपूर | | | लेखापरीक्षण, स्थानिक निधी लेखापरीक्षा, उपविभाग-१, नवी मुंबई. |

२. वरीलप्रमाणे बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी कार्यमुक्त झाल्यावर बदलीच्या पदावर तात्काळ हजर व्हावे. बदलीच्या पदावर हजर होताच शासनास तसेच संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांना अवगत करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(ता.र.पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर*
संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई. *
अपर मुख्य सचिव (ले. व को.) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
संबंधित अधिकाऱ्यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख*
संबंधित अधिकाऱ्यांच्या बदली कार्यालयाचे प्रमुख*
संबंधित अधिकारी*
निवडनस्ती कोषा प्रशा-१, २ व ३ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
(* संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय, मुंबई यांचेमार्फत)